REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 10 | JULY - 2024

# भारतातील राजकीय सहभागातील लिंगभेद

प्रा. विद्या चौरपगार
डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी नागपूर.

## सारांश




भारतीय राजकारणात लिंगभेद कायमच राहिला आहे. हा लिंगभेद अजूनही संपलेला नाही असेच चित्र मागील अनेक दशकांपासून दिसत आहे. स्त्रिया राजकारण करू शकत नाहीत का? त्यांना ते समजत नाही का? असे कितीतरी प्रश्न स्त्रियांच्या बाबतीत नेहमीच पडतात. परंतु यासर्व प्रश्नांची उत्तरे राजकारणात आपले ठळक अस्तित्व सिद्ध करणाऱ्या स्त्रियांनी ठोसपणे दिले आहे. २०२४ मध्ये पार पडलेल्या लोकसभा निवडणूक व आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महिलांचा राजकीय सहभाग हा महत्त्वाचा घटक ठरला आहे. सरकार मधील प्रतिनिधित्व, स्त्री मतदारांची वाढती संख्या, जिंकून येण्याचा शक्यता, राजकीय सक्रियता व राजकीय सहभाग याअर्थाने प्रस्तुत शोध लेखात देशातील महिलांच्या राजकीय सहभागाच्या विविध पैलूंचा शोध घेतला आहे.

## प्रस्तावना

भारतीय राजकरणातील पोलादी राजकीय व्यक्तीमत्व असलेल्या इंदिरा गांधीपासून तर विदेशी असूनही भारतीय राजकारणात आपली पाळीमुळे रुजवणाऱ्या सोनिया गांधीपर्यंत तसेच राजकीय वारसा असलेल्या अनेक स्त्रिया भारतीय राजकारणात ठसा उमटवताना दिसतात. तसेच जयललिता, सुषमा स्वराज, शीला दीक्षित, उमा भारती, मायावती, ममता बॅनर्जी यासारख्या स्त्रियांनी राज्याच्या मुख्यमंत्री पदापर्यंत केलेला प्रवास उल्लेखनीय आहे. राजकीय वारसा नसलेल्या स्त्रियांनी सुद्धा स्वतःला राजकारणात प्रस्थापित केले आहे. महुआ मोइत्रा हे त्याचे उत्तम उदाहरण म्हणता येईल. तसेच आणखी बरेच उदाहरणे देता येईल. पण तरीसुद्धा राजकारण हा स्त्रियांचा प्रांत नाही किंवा स्त्रियांनी राजकारणात लक्ष घालू नये, अशा गोंडस पुर्वग्रहाच्या बळी भारतीय स्त्रिया आहेत. त्यामुळे भारतीय राजकारणात कायम स्वरूपी लिंगभेद प्रकर्षाने दिसून येतो. या पार्श्वभूमीवर स्त्रियांच्या राजकीय सहभागाचे विश्लेषण विशेषतः २०२४ च्या निवडणुकांच्या संदर्भात करण्याचे योजिले आहे.

**मुख्य शब्द:** भारतीय राजकारण, स्त्रियांचा राजकीय सहभाग, लिंगभेद, सत्तेतील प्रतिनिधित्व, राजकीय पक्ष, राजकीय नेते

## संशोधनाची उद्दिष्टे

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहे.

१. स्त्रियांच्या राजकीय सक्षमीकरणाची चर्चा करणे.

२. राजकीय क्षेत्रातील लिंगभेद स्पष्ट करणे.

३. निवडणूक प्रक्रियेतील स्त्रियांचा वाढता सहभाग लक्षात घेणे.

४. राजकीय पक्षांच्या भूमिका लक्षात घेणे.

## अभ्यास पद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला. विश्लेषण पद्धतीचा वापर करून शासनाने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीचे विश्लेषण देऊन प्रस्तुत शोध निबंध तयार प्रामुख्याने करण्यात येईल.

## गृहीततत्वे:

१. राजकीय क्षेत्रात लिंगभेद प्रकर्षाने दिसून येतो.

## राजकीय सक्षमीकरण

दरवर्षी जागतिक जेंडर गॅप रिपोर्ट प्रसिद्ध केला जातो. 2024 च्या 'वर्ल्ड इकॉनोमिक फोरम' तर्फे हा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला. या अहवालानुसार यंदा भारत 146 देशांमध्ये 129 व्या स्थानावर आहे. "हा अहवाल पुरुष आणि स्त्रियांमधील जागतिक आणि देशनिहाय अशा लिंग असमानतेचं विश्लेषण करतो. आर्थिक सहभाग आणि संधी, शैक्षणिक उपलब्धता, आरोग्य जीवनमान यासोबतच राजकीय सक्षमीकरण अशा निकषांवर आधारित हा अहवाल असतो."[1]

या अहवालाप्रमाणे "2024 मध्ये संसदीय प्रतिनिधित्वातील लैंगिक समानता 33% च्या विक्रमी उच्चांकावर पोहोचली, जी 2006 (18.8%) च्या तुलनेत जवळजवळ दुप्पट आहे. राजकीय क्षेत्रात महिलांचे प्रतिनिधित्व संघीय आणि स्थानिक पातळीवर वाढले असले, तरी जागतिक स्तरावरील उच्च पातळीवरील पदे महिलांसाठी मोठ्या प्रमाणात उपलब्ध नाहीत."[2] यावरून असे लक्षात येते संसदीय प्रतिनिधित्वातील लैगिक समानते संदर्भात भारताने पुढचे पाऊल टाकले असले तरी महिलांचे हे प्रतिनिधित्व केंद्रीय आणि स्थानिक स्तरावर दिसतो. भारताची लोकसंख्या लक्षात घेता अर्धी लोकसंख्या स्त्रियांची आहे. आजपर्यंत भारतीय संसदेत स्त्रियांचे राजकीय प्रतिनिधित्व लोकसंख्येच्या प्रमाणात कधीच दिसले नाही. "राजकीय सक्षमीकरण या निकषाच्या बाबतीत देश संथ गतीनं का होईना, पण पुढे वाटचाल करत ७८ व्या स्थानावर पोहोचला आहे. पण संसदीय जागांपैकी १४ टक्के आणि मंत्रीपदांच्या जागांपैकी फक्त ९ टक्के जागा स्त्रियांच्या ताब्यात आहेत."[3] हे आकडे जागतिक सरासरीपेक्षा अर्थात कमी आहेत.

"नेपाळ आणि बांगलादेशसारख्या देशांनी या निकषांमध्ये भारताला मागे टाकलं आहे. नॉर्वे आणि इतर स्कँडिनेव्हियन देशांमध्ये राबवल्या जाणाऱ्या अनेकविध धोरणात्मक तरतुदींमुळे तिथे शिक्षण, आरोग्य आणि राजकीय सक्षमीकरणात स्त्री आणि पुरुषांमध्ये वाखाणण्याजोगी समानता दिसून येते. आर्थिक सहभाग, काम आणि दैनंदिन आयुष्याचा समतोल (work-life balance) आणि नेतृत्व भूमिकांमध्ये लैंगिक समानतेच्या दिशेनं या देशांनी एक वेगळी भरारी घेतली आहे."[4]

## भारतातील महिलांचे राजकीय प्रतिनिधित्व

भारतीय संविधानाच्या १९९२ च्या ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार देशातील पंचायत स्तरावर एक तृतीयांश पदे महिलांसाठी राखीव असणे बंधनकारक केले. स्थानिक पातळीवर महिलांचे राजकीय प्रतिनिधित्व वाढावे यासाठी हे धोरण राबविण्यात आले. या धोरणामुळे गावच्या सरपंच म्हणून निवडून आलेल्या महिलांच्या संख्येत झपाट्याने वाढ झाल्याची अनेक संशोधनातून पुढे आले. “१९९० च्या दशकाच्या मध्यापासून राज्य आणि राष्ट्रीय विधिमंडळाच्या जागांसाठी निवडणूक लढविणाऱ्या महिला उमेदवारांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होण्यास ही आवश्यकता कारणीभूत ठरली आहे.”[5] मात्र, उच्चपदांवर महिलांचे प्रतिनिधित्व कमी आहे. विशेषतः राज्यस्तरावरील महिलांचे प्रतिनिधित्व मागे पडले असून संस्थात्मक सत्ता आणि निर्णय प्रक्रियेच्या महत्त्वाच्या पदांपासून महिलांना वगळण्यात आले आहे. “आयजीसीने आपल्या संकेतस्थळांद्वारे 30 मार्च 2021 पर्यंत राज्य सरकारच्या नेतृत्व रचनेची माहिती संकलित केली आहे. तेव्हा नागालँड, सिक्कीम आणि मणिपूरसह भारतातील सहा राज्यांमध्ये एकही महिला मंत्री नाही, असे कोणतेही राज्य नाही जिथे एक तृतीयांश महिला मंत्री देखील आहेत, तर तामिळनाडूमध्ये महिला मंत्र्यांचे प्रमाण सर्वाधिक 13% आहे आणि 68% राज्यांमध्ये राज्य नेतृत्वाच्या भूमिकेत 10% पेक्षा कमी महिला प्रतिनिधित्व आहे.”[6] यावरून राजकारणातील लिंगभेद उघडपणे समोर येतो.

## लोकसभा निवडणूक 2024- महिलांची राजकीय भागीदारी

निवडणुकीत ‘महिला मतदारांची ताकद दिसूनही यंदाच्या निवडणुकीत स्त्रियांच्या राजकीय महत्वाकांक्षेचे दर्शन जेमतेम १४% टक्के एवढेच झाले.’[7] निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार यावेळेला “५४३ मतदारसंघासाठी एकूण आठ हजार ३६० उमेदवार लोकसभेसाठी उभे राहिले. त्यामध्ये ७९७ स्त्रिया होत्या. त्यापैकी ७४ महिला म्हणजे साधारण १३.६ टक्के स्त्रिया खासदार म्हणून निवडून आल्या. २०१९ च्या निवडणुकीत हेच निवडून येण्याचे प्रमाण १४ टक्के होते. तेव्हा ७२६ महिला उमेदवार निवडणुकीसाठी उभ्या राहिल्या होत्या. आणि त्यापैकी ७८ महिला निवडून आल्या होत्या.”[8]

**२०२४ निवडणूक: निवडून आलेल्या महिला उमेदवार**


| अनु क्र. | पक्ष | प्रमाण |
|---|---|---|
| १ | भाजप | ३१ |
| २ | कांग्रेस | १४ |
| ३ | तृणमूल काँग्रेस | ११ |
| ४ | झामुमो, राष्ट्रवादी शरद पवार गट, अपना दल, राजद, तेलगु देसम | ७ |
| ५ | समाजवादी पक्ष | ५ |
| ६ | द्रमुक | ३ |
| ७ | संयुक्त जनता दल | २ |
| ८ | लोकजनशक्ती पक्ष | २ |

संदर्भ: निवडणूक आयोग (9)

वरीलप्रमाणे आकडेवारी लक्षात घेता भाजपच्या तिकिटावर 31 महिला खासदार निवडून आल्या आहेत, काँग्रेस कडून 14 महिला खासदार तर तृणमूल काँग्रेसच्या 11 खासदार निवडून आल्या आहे. तर इतर म्हणजेच झामुमो, राष्ट्रवादी शरद पवार गट, अपना दल, राजद, तेलगु देसम वगैरे मिळून 7 खासदार समाजवादी पक्षाच्या 5, द्रमुक 3, संयुक्त जनता दल 2, आणि लोकजनशक्ती पासवान पक्षाच्या २ खासदार निवडून आल्या आहेत. अशा एकूण ७४ महिला खासदार १९ व्या संसदेत प्रतिनिधित्व करणार आहेत. निश्चितच ही आनंदाची व समाधानाची बाब आहे. परंतु या निवडणुकांचे निकाल असेही आहेत की, यावेळी मतदार म्हणून महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात होती तसेच मतदानाच्या टक्केवारीतही वाढ झाली पण, 2019 च्या तुलनेत संसदेतील महिला सहभाग कमी झाला.

**लोकसभा 2024: महिलांच्या मतदानाच्या टक्केवारीत वाढ होऊनही, संसदेतील महिलांचा सहभाग घटला:**

इंडिया टुडेने केलेल्या सर्वेक्षणानुसार 2024 च्या सार्वत्रिक निवडणुकीत, '14 वेगवेगळ्या राजकीय पक्षांच्या 74 नवीन महिला खासदार निवडणुका जिंकून संसद भवनात पोहोचल्या आहेत. जे 33% कोट्यापैकी केवळ 13.6% आहे.. राजकारणात महिलांच्या सहभागावर भर देऊनही तसेच, हा आकडा महिला आरक्षण कायदा, 2023 अंतर्गत निर्धारित केलेल्या 33% कोट्यापेक्षा खूपच कमी आहे.'[10] मात्र, काळानुसार लोकसभेतील महिलांचा सहभाग वाढला आहे. पण महिलांच्या सहभागात चढ-उतार आले आहेत. त्याचवेळी, 'इंडिया टुडेच्या डेटा इंटेलिजन्स युनिटने 1957 ते 2024 या काळात लोकसभेतील महिला प्रतिनिधीत्व आणि 1962 ते 2024 या कालावधीतील महिलांच्या मतदानाच्या टक्केवारीचे विश्लेषण केले आहे.'[11] ज्यामध्ये धक्कादायक माहिती समोर आली आहे. खालील तक्त्यावरून हे लक्षात घेता येईल.




वरीलप्रमाणे आकडेवारी दर्शविते की, मागील ७५ वर्षापासून राजकीय क्षेत्रात स्त्रियांचा अल्प सहभाग आहे. राजकीय महत्त्वाकांक्षी स्त्रिया जेव्हा राजकारणात स्वतःला प्रस्थापित करू पाहतात तेव्हा अनेक आव्हानांना त्यांना तोंड लागते. या क्षेत्रातील पुरुषी वर्चस्व, जातीवर्ग प्रभुत्व, लिंगभेद हा स्त्रीयांना राजकारणात प्रस्थापित होण्यास अडथळा निर्माण करतात.

सामजिकदृष्ट्या उत्पादनाच्या साधनांवरची मालकी नसणे आणि निर्णयप्रक्रियेत सहभाग नसणे या दोन गोष्टी दुय्यमपणाच्या स्पष्ट निर्देशक असतात.'[12]

## सर्वाधिक मतदानाची टक्केवारी असलेले राज्य

2024 च्या लोकसभा निवडणुकीत महिला मतदारांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. '14 लोकसभा मतदारसंघ असलेल्या आसाममध्ये महिलांनी सर्वाधिक मतदान केले आहे. येथे महिलांनी 81.71% मतदान केले आहे.'[13]' 25 लोकसभा मतदारसंघ असलेल्या आंध्र प्रदेशातही महिलांनी मोठ्या प्रमाणात मतदान केले. येथील महिलांची मतदानाची टक्केवारी 80.3% आहे.'[14] '42 लोकसभा मतदारसंघ असलेल्या पश्चिम बंगालमध्ये महिलांच्या मतदानाची टक्केवारी 80.18% आहे.'[15] 'ओडिशामध्ये चौथ्या क्रमांकावर महिलांचे मतदान ७५.५५% आहे.'[16] केवळ '11 लोकसभा मतदारसंघ असलेल्या छत्तीसगडमध्येही महिलांनी 72.23% मतदान करून सक्रिय सहभाग घेतला आहे.'[17]

वरीलप्रमाणे आकडेवारी दर्शविते की,2024च्या निवडणुकांत स्तीयानानी वरील पाच राज्यात उत्स्फूर्त सहभाग घेतला व राजकीय प्रक्रियेचा भाग बनल्या. म्हणजे स्त्रियांच्या मतदान टक्केवारीत वाढ झाली असली तरी उमेदवार होण्याची टक्केवारी व निवडून येण्याची टक्केवारी मात्र फारशी वाढलेली दिसत नाही. यावरून भारतीय राजकारणातील लिंगभेद उघड होतो.

## निष्कर्ष

भारतातील लैंगिक पूर्वग्रह असलेल्या सामाजिक प्रवृत्ती घराबाहेरील स्त्रियांची भूमिका मर्यादित करतात. अनेकदा घरात स्त्रियांचे स्थान महत्वाचे मानले जाते, तर पुरुषांना सामुदायिक संस्थांमध्ये गुंतण्याची मुभा दिली जाते आणि राजकारणाकडे केवळ पुरुषांचे क्षेत्र म्हणून पाहिले जाते. ज्यामुळे स्त्रिया सार्वजनिक क्षेत्रात अत्यंत महत्वाच्या असलेल्या राजकीय क्षेत्रात पुरुषांच्या तुलनेत अगदी कमी प्रमाणात दिसतात.

## संदर्भ सूची

१. https://hindi.feminisminindia.com/2024/06/17/global-gender-gap-index-2024-hindi/# google_vignette
२. Ibid
३. https://www.loksatta.com/chaturang/global-gender-gap-report-is-released-every-year-by-the-world-economic-forum-a-review-of-the-report-released-this-year-ssb-93-4465993/
४. Ibid
५. https://www.ideasforindia.in/topics/social-identity/leaders-and-citizens-women-s-political-participation-in-india-hindi.htm नेता और नागरिक: भारत में महिलाओं की राजनीतिक भागीदारी, 16 अप्रैल, 2021
६. Ibid
७. 'राणीचे राज्य', लोकसत्ता, शनिवार १५ जुन २०२४, पृ.७

८. Ibid

९. **निवडणूक आयोग**

१०. https://marathi.aajtak.in/india/story/lok-sabha-2024-despite-the-increase-in-the-percentage-of-women-voting-the-participation-of-women-in-parliament-has-decreased-1023936
अंकिता तिवारी**, 8 Jun, 2024**

११. Ibid

१२. स्त्रियांचा सहभाग आणि लिंगभाव समानता ,मिलिंद बोकील, २४ जाने, २०२१
https://kartavyasadhana.in/view-article/milind-bokil-melghat-series-part27

१३. https://marathi.aajtak.in/india/story/lok-sabha-2024-despite-the-increase-in-the-percentage-of-women-voting-the-participation-of-women-in-parliament-has-decreased-1023936
अंकिता तिवारी**, 8 Jun, 2024**

१४. Ibid

१५. Ibid

१६. Ibid

१७. Ibid